नि.क्र. ९९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दि. २/२/२०२१ रोजी नि.क्र. ९१ कडे झालेल्या आदेशाचे अंमलबजावणी करण्याकरिता दाखल केलेला आहे.

प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दि. २०/१२/२०१८ रोजी नि.क्र. ९१ कडे प्रतिवादीकडे दि.प्र.सं. आदेश २६ नियम ०९ प्रमाणे दाखल केलेला होता. तो दि. २/२/२०२१० रोजी गुणदोषावर मंजूर झालेला आहे. परंतू सदर आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे सदर आदेशाची अंमलबजावणीकरिता प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

वादी यांनी अर्जावर म्हणणे देवून अर्ज व त्यातील कथने नाकारली आहे. वादींचे असे कथन आहे की, दाव्यातील कार्यवाहीचा विचार करता, नि.क्र. ९१ कडे झालेला आदेशाची आवश्यकता राहिलेली नाही. प्रस्तुतचा अर्ज मुदतबाह्य आहे. प्रस्तुत कामी संयुक्त मोजणी झाली असून कोर्ट कमिशनर यांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. प्रतिवादी हे केवळ दाव्याचे काम प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

२. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे त्यांनी केलेल्या कथनांप्रमाणेच युक्तिवाद करण्यात आलेला आहे. सर्व प्रथम येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, नि.क्र. ९१ कडे दि. २/२/२०२१ रोजी झालेल्या आदेशाविरुध्द वादी यांनी कोणतेही अपिल अथवा दाद मागितल्या विषयी अभिलेखावर कागदपत्रे दाखल केलेली नाही अथवा तसा त्यांचा बचाव देखिल नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, नि.क्र. ९१ कडे या न्यायालयाचे पुर्वाधिकारी यांनी दि. २/२/२०२१ रोजी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी अद्यापही झाली नसल्याचे दिसून येते. वर नमूद केल्याप्रमाणे सदरचा आदेश आव्हानित

केल्याचे दिसून येत नाही. तसेच सदरचा आदेश हा कोरोना महामारीच्या काळात पारित केल्याचे दिसून येते. वादी यांना सदर आदेशाविरुध्द कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी तो आदेश आव्हानीत करणे आवश्यक होते. परंतू, तसा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल नाही. नि.क्र. ९१ कडे दि. २/२/२०२१ रोजी पारित केलेला आदेश प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे, न्यायदानास मदतच होणार आहे. या न्यायालयाच्या पुर्वाधिकारी यांनी केलेल्या आदेशाच्या बाहेर या न्यायालयास जाता येणार नाही. त्यामुळे, एकंदरीत परिस्थीतचा व अभिलेखावर उपस्थित असलेल्या कागदपत्रांचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी एक महिन्याच्या आत योग्य ती पुर्तता करुन कमिशन फी भरुन त्याची पावती या न्यायालयात दाखल करावी.

Digitally signed by ANIKET ARUN KALAMKAR
Date: 2022.11.03 16:15:40 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

(अ.अ.कळमकर)

दि. ०३/११/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, घाटंजी.